ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ]
Total No. of Questions : 26 ]

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4
[ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 310-M (RS)**
**Code No. : 310-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ಪ್ರಥಮ ವರ್ಷ
# D.El.Ed. FIRST YEAR
# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಕಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)
# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ
# FACILITATING LEARNING ( LPS )
# FIRST LANGUAGE — MARATHI

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**
**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 18. 05. 2019 ]
Date : 18. 05. 2019 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ]
Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ]

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60
[ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

***सामान्य सूचना :*** i) प्रत्येक उत्तराचे चिंतन करून, संघटन करून लिहीण्यास योग्य व्हावे म्हणुन या पेपरला 3 तास वेळ दिला आहे.

ii) प्रत्येक प्रश्नासाठी ज्या सूचना दिल्या आहेत, त्यानुसार उत्तरे लिहा.

## भाग - I

I. खालील प्रश्नाना **चार** बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य असे एक उत्तर निवडुन लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण दिलेला आहे. प्रत्येक प्रश्न सक्तिचा आहे. ( प्रत्येक प्रश्नाला **1** गुण ) :

$10 \times 1 = 10$

1. इंग्रजीमध्ये या शब्दाचा अर्थ नसुनसुद्धा काही वेळा त्या भाषेत याचा वापर केला जातो.
(अ) मास्तर (आ) शिक्षक
(इ) गुरू (ई) गुरूजी.

2. मुलाचा ज्ञानात्मक विकास या भाषेमुळे होतो.
(अ) राज्यभाषेमुळे (आ) मातृभाषेमुळे
(इ) प्रादेशिक भाषेमुळे (ई) अंतरराष्ट्रीय भाषेमुळे.

3. काही मुले शाळेत बोलण्यास घाबरतात.

(अ) शाळेतोल नवीन वातावरणामुळे (आ) शिक्षकांच्या वर्तनामुळे

(इ) मुख्याध्यापकांच्या भितिमुळे (ई) मित्रांच्या दबावामुळे.

4. इ । ली च्या वर्गात अध्ययन करणारे मुल हे आपल्या मातृभाषेच्या माध्यमातुन अध्ययन न करता दुसऱ्याच माध्यमातुन अध्ययन करत असेल तर ते मुल मातृभाषेतुन अध्ययन करणाऱ्या मुलापेक्षा इतक्या वर्षानी अध्ययनात मागे असते.

(अ) 7 वर्षानी (आ) 5 वर्षानी

(इ) 10 वर्षानी (ई) 4 वर्षानी.

5. प्रचलित काळात यामुळे वाचनाची आवश्यकता फार कमी होत चालली आहे.

(अ) दूरदर्शन आणि इंटरनेट (आ) पाठ्यपुस्तके

(इ) मार्गदर्शन पुस्तके (ई) रेडीओ.

6. मातृभाषा सोडून या भाषेच्या प्रतिष्ठेसाठी आम्ही त्या माध्यमाच्या शाळेत मुलाना पाठवत आहे आणि त्यामुळे त्याचा परीणाम मुलांच्या अध्ययनावर होत आहे.

(अ) मराठी (आ) कन्नड

(इ) इंग्रजी (ई) हिंदी.

7. ज्ञानात्मक विकासाचा आणि भाषा विकासाचा असा संबंध आहे.

(अ) फार दूरचा संबंध आहे (आ) कोणताही संबंध नाही

(इ) फार जवळचा संबंध आहे (ई) साधारण संबंध आहे.

8. सर्वसमावेशक वर्गात प्रत्येक मुलासाठी अशा प्रकारचा अध्ययन करण्याचा परीसर असतो.

(अ) वैयक्तिक अध्ययन करण्याचा

(आ) गटा-गटाने अध्ययन करण्याचा

(इ) सामर्थ्य गटानुसार अध्ययन करण्याचा

(ई) सर्वांबरोबर मिळुन मिसळुन सहकाराने अध्ययन करण्याचा.

9. मंदगतिने अध्ययन करणाऱ्या मुलाना असे शिकविले पाहीजेत.

(अ) चित्रांचे वाक्याद्वारे विवरण केले पाहीजेत

(आ) अमुर्त कल्पनाना अनेक प्रकारची मुर्त उदाहरणे देऊन शिकविले पाहीजेत

(इ) मुलांच्या संभाषणातील चुकांचे निरसन केले पाहीजेत

(ई) शारीरिक हालचालीद्वारे सूचना दिल्या पाहीजेत.

10. संभाषणात दोष असणाऱ्या मुलांची ही समस्या असत.

(अ) शिकविलेला भाग समजत नाही (आ) श्रवण करता येत नाही

(इ) स्पष्ट उच्चार करता येत नाही (ई) बोलता येत नाही.

## भाग - II

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **दोन** गुण ) : 5 × 2 = 10

11. इयत्ता पहीलीच्या वर्गात दाखल झालेले मुल भाषेचे अध्ययन कसे करते ? चर्चा करा.
12. प्राथमिक शिक्षण हा मुलाच्या शालेय शिक्षणाचा पाया आहे. समर्थन करा.
13. तुम्ही एक भाषा शिक्षक या नात्याने मुलाच्या भाषा विकासात कोणता हातभार लावाल ?
14. मुलाचा अक्षर लेखनाचा अभ्यास झाल्यानंतर स्वतंत्रपणे लेखन करणयाच्या पायऱ्या सांगा.
15. तुम्ही प्रारंभो शाळेत दाखल झालेल्या मुलांच्या लेखनाचा सराव कसा करून घ्याल ?
16. शुद्धलेखन कृती देताना प्रारंभो कोणत्या सूचना दिल्या पाहीजेत ? चर्चा करा.
17. घरातुन प्रारंभी शाळेत आल्यानंतरची मुलाची भूमिका कशी असावी ?
18. साक्षरतेचा माग सुगम करण्याचे अंश सांगा.

## भाग - III

III. खालील प्रत्येक प्रश्नाला निवड दिलेली आहे. त्यातोल कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ हवे. ( प्रत्येक प्रश्नाला **5** गुण ) : 8 × 5 = 40

19. अ) भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

आ) प्रथम भाषा आणि शालेय भाषा यातोल फरक स्पष्ट करा.

20. अ) मुलाला त्याच्या अनौपचारिक संभाषणातुन औपचारिक संभाषणात बदल घडऊन आनण्यास कोणते प्रयत्न कराल ?

**किंवा**

आ) तुम्ही एक भाषा शिक्षक या नात्याने स्थानिक संपन्मूल्याचो आणि बालसाहित्याची समोक्षा कशी कराल ?

21. अ) मुलांमध्ये चिंतनशोलता निर्माण होण्यास तुम्ही कोणते उपक्रम राबवाल ?

**किंवा**

आ) मुलाना कथा सांगण्या अगोदर शिक्षकाने कथेची पर्व तयारी करणे आवश्यक आहे. समर्थन करा.

22. अ) मुलानी वाचन केलेला भाग त्याना समजला की नाही हे समजुन घेण्यास कोणत्या कृती द्याव्यात ?

**किंवा**

आ) मुलांच्याकडून वाचनाची पर्व तयारी करून घेताना औपचारिक वाचनाचा सराव आणि वाचन केलेल्या पाठाचे महत्वाचे अंश ओळखण्याचा सराव कसा करून घ्याल ?

23. अ) मुलाला त्याच्या घरच्या भाषेचा शाळेतील भाषेशी समन्वय कसा साधावा ?

**किंवा**

आ) तुम्ही एक वर्गशिक्षक या नात्याने संपन्मूल्ययुक्त असा वर्ग कसा बनवाल ?

24. अ) मुलाचा संभाषण संदर्भ, सामाजिक परिसर, खेळ हे सर्व भाषा अध्ययनाची संपन्मूल्ये आहेत. ती कशी ? स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मुलाचे समाजात भाषेचे अध्ययन कसे होते ? स्पष्ट करा.

25. अ) सर्वसमावेशक वर्गातोल मुलांच्या पालकाना त्यांच्या मुलांच्या विकासासाठी कशा प्रकारे मार्गदर्शन करावे ?

**किंवा**

आ) तुम्ही सर्वसमावेशक वर्गात भाषा अध्यापनाची पूर्व तयारी कशी कराल ? सविस्तर लिहा.

26. अ) खालील कथा तुमच्या कल्पनेचा आधार देऊन पूर्ण करा आणि कथेला योग्य असे शोर्षक सूचवा.

एका गावात रामु नावाचा एक गरीब शेतकरी होता. तो शेतात मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. त्याच्या गावात जाण्याचा कच्चा रस्ता होता. त्या रस्त्यात मधोमध एक दगड होता. तो रस्त्याने येणा-जानाऱ्या प्रवाशाना एक अडथळाच होता. मात्र तो दगड काढुन टाकण्याचा विचार कोणीही केला नाही.

एके दिवशी एक सावकार घोडागाडीतून त्या रस्त्याने जात असताना त्या दगडाला घोडागाडी अदळुन पलटी झाली. सावकाराला खुप मार लागला. त्याने गावकऱ्याना ओरडले. अशा प्रकारे दररोज त्या दगडामुळे एक ना एक अपघात होत असे. एके दिवसी रामु त्या रस्त्याने चालत जात होता. त्याची नजर त्या दगडाकडे गेली आणि तो विचार करू लागला .......................

**किंवा**

आ) खालील कथेशी संबंधित पुढील प्रकारचे प्रश्न तयार करा आणि कथेला योग्य असे शोर्षक सूचवा.

(I) माहीती मिळविता येणारे प्रश्न सहा

(II) चिंतनात्मक प्रश्न दोन

एका गावात एक किसन नावाचा भिकारी रहात होता. तो अंधळा होता. तो गावात भिक मागुन आपले पोट भरत होता.

एक दिवस किसन रात्रीच्यावेली पाती घेऊन कोठेतरी चालला होता. त्याच्या हातात कंदील आणि डोकीवर पाण्याने भरलेली मातीची घागर होती. वाटेत लोक किसनच्या हातात कंदील पाहुन त्याला वेडा म्हणुन हसु लागले.

थोड्या अंतरावर गेल्यावर त्याच गावातील गोपाळ नावाच्या उनाड अशा मुलाशी गाठ पडली. गोपाळने किसनच्या हातात कंदील पाहुन त्याची चेष्टा करण्यास प्रारंभ केला. गोपाळ किसनला म्हणाला "अरे किसन, तुझ्या हातात काय आहे ?" किसन हसुन म्हणाला "गोपाळ तु अंधळा आहेस का ? हा तर माझ्या हातात कंदील आहे." गोपाळ म्हणाला "तु तर आंधळा आहेस आणि कंदील कशाला ? " त्यावर किसन म्हणतो "भाऊ हा कंदील माझ्यासाठी नाही, तुझ्यासारव्या डोळे असणाऱ्या अंधळ्यांसाठी मी हा कंदील घेऊन जात आहे." गोपाळला किसनचे ते बोलणे ऐकून राग येतो "ता किसनला रागाने म्हणतो "मला अंधळा म्हणतोस ? किसन त्याला समजावतो "मित्रा माझा बोलण्याचा उद्देश तसा नाही, मी माझ्या परीने वाट शोधत जाईन पण येणाऱ्या व्यक्तिला अंधारात मी दीसलो नाहीतर तो व्यक्ति मला आदेळेल आणि माझ्या डोकीवरची पाण्याची घागर पडुन फुटुन जाईल, त्यासाठी दुसऱ्याला मी दीसावा म्हणुन कंदील आनला आहे.

आता खुप चेष्टा करणाऱ्या गोपाळला किसनची दया आली आणि त्याने किसनची माफी मागितले.